

देशातील सुन्न हवेला , होती जनता कंटाळून
मनोरंजनाचो प्रकाश होता, गेला पार झाकाळून

तेव्हा भूकेल्या रसिकांसाठी , घडला एक चमत्कार
त्या भगवंताने घेतला , साक्षात् पु. ल. चा अवतार

संतांच्या ह्या मऱ्हाटभूमीत, जन्मला आणखी एक संत
अध्यात्मावाचून केले ज्याने , असख्यांना सुखवंत

अनेक कलांचा ब्रह्मदेव तो , उगवला क्षितीजावर
तेजोमय त्या मनुष्याच्या , शारदा नांदली जिव्हेवर

अनेक सिनेमे , नाटक , गाणी , अनेक पुस्तके नावावर
हार्मोनियमचा उस्ताद त्याच्या , कित्येक पूरस्कार नावावर

किमान चार पिढ्यांना ज्यांनी , मनमुराद निखळ हसवले
आधीचे हसले , पुढचेही हसतील , भगवंतानेच आहे ठरवले

केवळ अंधविद्यार्थ्यांसाठी ज्यांनी, होते नाटक बसवले
ब्रेलयंत्राची रक्कम जमताच , ते नाटक तूर्त आटपले

ह्यासारख्या कित्येक गोष्टी ज्यांनी , केल्या केवळ इतरांसाठी
कलेवर प्रेम करणाऱ्या कोणी , एवढे केले का कोणासाठी !

समर्थांच्या 'उत्तम पुरुषाला', शोभतो हा 'पुरुषोत्तम '
कलेचा हा अवतार राहील, सदैव सर्वोत्तम

कलेच्याच एक भक्ताने , हास्यदेवतेचे हे रूप रेखाटले
सदैव कृपा असावी भक्तांवर , हेच केवळ मागितले

झाले बहु , होतील बहु , परी ह्यासम हाच !

- केदार उ. पाटणकर